**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. ९**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक ११/७/२०१८ रोजी दुपारी ३=३० ( साडे तीन ) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. ५१**

**मा. सौ.अर्चना तुषार पाटील यांचे दि.५.७.२०१८ चे पत्र .**

पुणे मनपाच्या अखत्यारीत असलेले भवानी पेठ भागातील सोनावणे हॉस्पिटल येथे येत असलेले रुग्ण तसेच रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांना नाश्ता व जेवणाची सोय सदरील हॉस्पिटल परिसर मध्ये नाही.

तरी सदर हॉस्पिटल परिसरातील स्थानिक महिला बचत गट म्हणजेचे जिजाई महिला बचत गट आणि ७८६महिला बचत गट या बचत गटांना सदर ठिकाणी कॅन्टीन चालू करणेस परवानगी देण्यात यावी .

**विषय क्र. ५२**

**मा.सायली रमेश वांजळे यांचे दि.६.७.२०१८ चे पत्र.**

प्रभाग क्र. ३२ ( वारजे माळवाडी ) गणपती माथा लगत जुने सार्वजनिक शौचालय असून ते नादुरुस्त झालेले असल्याने सदरचे शौचालय पाडून त्याच ठिकाणी नवीन शौचालय बांधण्यात यावे .

**विषय क्र. ५३**

ज्वेलरी डिझायनिंग प्रशिक्षणासाठी खरेदी केलेल्या मशिनरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाकडील ज्वेलरी डिझायनिंग प्रशिक्षण केंद्रासाठी उपलब्ध करुन देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि / २४३, दि.४.७.२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ५४**

त्वचारोग तज्ञ,एडस,नोडल ऑफिसर,मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, कार्डिओलॉजिस्ट/ हृदयरोग तज्ञ, न्यायवैद्यकशास्त्र /वैद्यकीय अधिकारी (न्यायवैद्यकशास्त्र),नेत्र शल्यचिकित्सक/ नेत्रतज्ञ,रक्तसंक्रमण अधिकारी (वर्ग १) (वेतनश्रेणी–१५६००–३९१००+ ग्रेड पे ६६००) या पदावरील नेमणूकीबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ उआ (सा.प्र.) आस्था/७९३, दि.९/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**